# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट १९४-२२** — **दिनांक : २८/०६/२०२२**

## नोकराने चोरी केलेले रुपये २१,१७,५००/- किंमतीचे सोने हस्तगत करण्यात माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकास यश

दिनांक ०६/०६/२०२२ रोजी तक्रारदार नामे श्री. महेंद्र वगतावरमल राणावत, वय ५५ वर्षे यांच्याकडे सोनाच्या कारखान्यामध्ये कारागीर म्हणुन नोकरी करत असलेल्या दोन इसमांनी अंदाजे रु. २५,१३,०००/- किंमतीच्या ७१४ ग्रॅम सोन्याची चोरी केल्याची तक्रार माणिकपुर पोलीस ठाणे येथे देण्यास आल्याने गु.र.क्र. २०३/२०२२ कलम ३८१,३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रिक मदतीच्या आधारे आरोपींचा बारमेर (राजस्थान), रायपुर (छत्तीसगड), हुगळी (पश्चिम बंगाल) या ठिकाणी सतत १२ दिवस शोध घेवुन आरोपी नामे १) नजिम सिराज अली मुल्लाह, धंदा- नोकरी, रा. गाव मध्यमपाडा, भरातजपुर, पोस्ट भरातजपुर, थाना चंडीतला, स्टेशन बेगमपुर, जि. हुगळी, पश्चिम बंगाल. २) अलाऊद्दीन मुन्नाफ शेख, धंदा- नोकरी, रा. गाव कपासरीया, पोस्ट बोरा बाजार, थाना चंडीतला, स्टेशन बेगमपुर, जि. हुगळी, पश्चिम बंगाल यांना हुगळी, पश्चिम बंगाल येथुन अटक करण्यात आली आहे तसेच त्यांचेकडुन गुन्हयात चोरीस गेलेल्या सोन्यापैकी अंदाजे ५९८ ग्रॅम वजनाचे व २१,१७,५००/- रुपये किंमतीचे सोने हस्तगत करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०२, श्री. प्रदीप गिरीधर, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग, श्री. संपतराव पाटिल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.ह. शैलेश पाटिल, शामेश चंदनशिवे, धनंजय चौधरी, पो.शि. गोपाळ कोळेकर, प्रविण कांदे यांनी केलेली आहे.

.........ooo.........